गुरुवार, १० मार्च २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २३२
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## रायगड जिल्हा आता मास्कमुक्त; आदेश जारी



**अलिबाग** : विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाई करू नका, असे आदेश रायगड जिल्हा पोलीस अधीक्षकांनी पोलिसांना दिले आहेत. त्यामुळे विनामास्क जिल्ह्यात फिरत असल्यास आता पोलीस तुमच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई करणार नाहीत. रायगड जिल्हा मास्कमुक्त झाला असून रायगडकरांसह पर्यटकांनाही दिलासा मिळाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विनामास्क फिरणाऱ्यावर कारवाई करू नका, असे पत्र जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयास देण्यात आले होते. त्यानुसार जिल्हा पोलीस अधीक्षकांनी विनामास्क केसेस बंद करण्याचे आदेश काढले आहेत. या आदेशाच्या अनुषंगाने आता रायगड पोलीस हद्दीत विनामास्क फिरणाऱ्यांवर कारवाई करू नका, असे पत्र सर्व पोलीस ठाण्यांत आणि वाहतूक शाखांना देण्यात आले आहे.

अंतरंग
संजय राऊत किती बोलतात -राज ठाकरे/२
म्हसळ्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील कामे ठप्प/५
क्रिकेट स्पर्धेत रायगड संघाचा नाट्यमय विजय/६

# नवाब मलिक हटाओ, महाराष्ट्र बचाओ!

## राजीनाम्यासाठी भाजपचा मुंबईत विराट मोर्चा

**मुंबई : प्रतिनिधी**
अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या हस्तकांशी केलेल्या आर्थिक व्यवहारप्रकरणी ईडी कोठडीत असलेले राज्याचे अल्पसंख्याक विकासमंत्री तथा राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांच्या राजीनाम्यासाठी बुधवारी (दि. ९) भाजपच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानात विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल करीत उद्धवजी तुम्ही बाळासाहेबांना काय उत्तर देणार, असा सवाल केला. (पान २ वर ..)

### उद्धवजी तुम्ही बाळासाहेबांना काय उत्तर देणार? -देवेंद्र फडणवीस



**देशद्रोह्यांसाठी महात्मा गांधींच्या पुतळ्याजवळ आघाडीचे नेते आंदोलन करतात. गृहमंत्रीही या पुतळ्याखाली आंदोलनाला बसतात. त्या ठिकाणी महात्मा गांधी असते, तर तुम्हाला फासावर लटकवल्याशिवाय राहिले नसते. गेंड्याच्या कातडीच्या या सरकारला पाझर फुटत नाही, मात्र नवाब मलिक यांचा राजीनामा घेतल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.**
**-प्रवीण दरेकर, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधान परिषद**



देशद्रोह्यांच्या साथीदारांना पाठीशी घालणाऱ्या महाविकास आघाडीचा रायगड भाजपकडून धिक्कार

(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

### दाऊदच्या दबावामुळेच ‘तो’ निर्णय बदलण्यात आला -चंद्रकांत पाटील

राज्यात गेल्या २७ महिन्यांत संजय राठोड यांचा राजीनामा पक्षाने दबावात आल्यानंतर घेतला, तर अनिल देशमुखांच्या बाबतीत हायकोर्टाने सीबीआय चौकशीचे आदेश दिले. त्यानंतर राजीनामा घेतला. आता नवाब मलिकांना न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर राजीनामा घ्यायचा निर्णय झाला, पण थोड्या वेळात हा निर्णय बदलला. हा निर्णय दाऊदच्या दबावामुळेच बदलला, असा आरोप भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केला. या सरकारला घालवण्यासाठी आम्ही रस्त्यावर आलो आहोत, असेही ते म्हणाले.

**अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमने या देशावर आक्रमण केले, बॉम्बस्फोट घडवून आणले. त्यात अनेक निष्पाप माणसे मारली गेली. त्या दाऊदशी व त्याच्या माणसांशी संबंध ठेवणाऱ्या लोकांना हे सरकार पाठीशी घालत आहे. महाराष्ट्र कधीही दाऊदच्या कराचीसमोर झुकणार नाही. आजचा मोर्चा हा मलिकांच्या राजीनाम्यासाठीच आहे. सरकारने त्यांचा राजीनामा घ्यावा.**
**-आमदार आशिष शेलार, भाजप नेते**

### रायगडातून असंख्य कार्यकर्ते झाले सहभागी

*मविआ सरकारमधील मंत्री नवाब मलिक यांच्या राजीनाम्यासाठी भाजपने मुंबईत काढलेल्या मोर्चात उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी यांच्यासह रायगडातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली.*

महाड एमआयडीसीतील सांडपाणी वाहिनीच्या दुरुस्तीस विलंब

## आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी वेधले शासनाचे लक्ष



अर्थसंकल्पीय अधिवेशन

**मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**
महाड येथील औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहून नेण्याची वाहिनी नादुरुस्त असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मुंबई येथे सुरू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करीत या समस्येवर शासनाचे लक्ष वेधले.

रायगड जिल्ह्यातील महाड येथील औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहून नेण्याची वाहिनी नादुरुस्त असल्यामुळे औद्योगिक वसाहतीतील रासायनिक व दूषित पाणी उक्त परिसरातील शेतीत शिरून शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे जानेवारी २०२२मध्ये निदर्शनास आले आहे. या औद्योगिक वसाहतीत सुमारे ३५ किलोमीटरच्या सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीच्या दुरुस्तीच्या कामासाठी जवळपास २०० कोटीपेक्षा जास्त खर्च होणार असून सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी दुरुस्त करण्यासाठी २५ टक्के खर्च करण्याची तयारी महाड औद्योगिक वसाहतीतील उत्पादक संघटनेने दाखविली असूनसुद्धा संबंधित विभागातील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनीच्या दुरुस्तीच्या कामात विलंब होत आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीच्या अनुषंगाने सांडपाणी वाहून नेण्याच्या वाहिनीच्या कामासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, अशी विचारणा आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून केली. (पान २ वर..)

### रायगडात अवकाळी पावसाची हजेरी



**कर्जत : रायगड जिल्ह्याच्या काही भागांत बुधवारी अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे उष्ण वातावरणात दिलासा मिळाला असला तरी अनेकांची तारांबळ उडाली.**

पनवेल महानगरपालिका
पनवेल महानगरपालिका स्थापना - २०१६
करदात्यांचा एकच ध्यास
पनवेलचा संपूर्ण विकास
३१ मार्च २०२२ पर्यंत आपला मालमत्ता कर भरुन ५% सूट मिळवा
PMC TAX App उपलब्ध आहे Google Play Store
www.panvelmc.org
www.panvelcorporation.gov.in
पालिकेच्या वेबसाइटवर जा
आपला मोबाईल नंबर आणि ईमेल रजिस्टर करा
आपल्या कराची पडताळणी करा
क्रेडिट/डेबिट कार्ड आणि नेट बँकिंगद्वारे कराचा भरणा करा
ईमेल वर कर भरल्याची पावती मिळवा
विशेष सुविधे अंतर्गत अधिक २% सुट
१) कराचा भरणा www.panvelmc.org या संकेतस्थळावर ONLINE भरल्यास
२) सौर ऊर्जा अंतर्गत सुविधा (DISCOUNT UNDER SOLAR ENERGY)
३) जलसंवर्धन सुविधा (RAIN WATER HARVESTING FACILITY)
४) कचरा विलगीकरण करणे सुविधा (GARBAGE SEGREGATION FACILITY)
५) कचरा विल्हेवाट लावणे सुविधा (GARBAGE DISPOSAL FACILITY)
(टीप : अनु क्र. २ ते ५ मधील कोणतीही अथवा सर्व सुविधा उपलब्ध असल्यास प्रत्येकी २% सुट मिळवता येईल.)
१८०० ५३२० ३४०
अधिक माहितीसाठी टोल फ्री नंबर वर कॉल करा
वेळ - सकाळी १० वा. पासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
(सार्वजनिक सुट्ट्या वगळता)
मालमत्ता कर भरा !!! विकासाला सोबत करा !!!

# संजय राऊत किती बोलतात

## ■ मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा टोला

**पुणे : प्रतिनिधी**

संजय राऊत यांनी आता शांत बसावे. प्रत्येकाबाबत त्यांना काही ना काही बोलायचेच असते. ते किती बोलतात, असा टोला मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लगावला. मनसेच्या वर्धापन दिनी पुण्यामध्ये बुधवारी (दि. ९) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मनसे अध्यक्ष ठाकरे बालत होते.



पुणे येथे झालेल्या मनसेच्या वर्धापन दिन कार्यक्रमात राज ठाकरे यांनी राज्य सरकारच्या कारभारावरही ताशेरे ओढले. संजय राऊत हे दररोज अत्यंत वाईट भाषेत आरोप-प्रत्यारोप करतायेत. महाराष्ट्रातल्या भविष्यातील पिढ्या हे पाहातायत. ते उद्या काय शिकतील? आणि या सगळ्या वातावरणात तुमची अपेक्षा आहे की, लोकांनी तुम्हाला मतदान करावं?, असे प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केले.

महिलांच्या प्रश्नांविषयी, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांविषयी, नोकऱ्यांच्या मुद्यांवर, एसटीविषयीही राज्य सरकार बोलायला तयार नाही. जे लोक तुम्हाला मतदान करतात, त्यांचे आभार माना. कारण त्यातले एक टक्का लोकही तुमच्याकडे काही कामासाठी येत नाहीत. उगीच संपर्क कार्यालय उघडून बसतात, असा टोला त्यांनी लगावला.

## पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा आज लागणार निकाल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशसह पंजाब, उत्तराखंड, गोवा आणि मणिपूर या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल गुरुवारी (दि. १०) जाहीर होणार आहे. संपूर्ण देशाचे लक्ष या निकालांकडे आहे. खास करून उत्तर प्रदेश निवडणुकीच्या निकालाची सर्वांना उत्सुकता आहे. सर्व राज्यांमध्ये सकाळी ८ वाजेपासून मतमोजणीला सुरवात होणार आहे. सायंकाळपर्यंत सर्व कल हाती येऊन चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

मतमोजणीसाठी प्रशासकीय यंत्रणेने तयारी पूर्ण केली आहे. मतमोजणी केंद्रांबाहेर चोख पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आलेला आहे. या पाच राज्यांमध्ये उत्तर प्रदेश हे सर्वांत मोठे राज्य आहे. त्यामुळे तेथील संपूर्ण निकाल जाहीर होण्यासाठी वेळ लागू शकतो.

# महिलांसाठी आधार कार्ड शिबिर

## नगरसेविका नेत्रा पाटील यांचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या दिवशी प्रभागातील महिलांसाठी आधार कार्ड शिबिराचे तसेच खारघर पोस्ट ऑफिस यांच्या वतीने सुकन्या समृद्धी योजना अंतर्गत नवीन खाते उघडण्याचा उपक्रम राबविण्यात आला.



या शिबिरामध्ये अनेक महिला भगिनींनी आपले आधार कार्डमधील पत्त्यात बदल ,नावात बदल, फोटो दुरुस्ती अशा अनेक सुविधांचा लाभ घेतला. महिलांना आपल्या रोजच्या धावपळीत घर कामात वेळ मिळत नसल्या कारणाने खास त्यांच्यासाठी सदर शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे नगरसेविका नेत्रा पाटील यांनी सांगितले. सदर शिबिरात सुमारे ७५ ते ८० महिलांचे आधार कार्ड अपडेट करण्यात आले. ० ते ५ वयोगटातील २५ मुलामुलींचे नवीन आधार कार्ड बनविण्यात आले. त्याचबरोबर १० मुलींचे सुकन्या समृद्धी योजना अंतर्गत खाते उघडण्यात आले. शिबिरासाठी मंजू चोप्रा, दीपा पिल्लाई, अर्चना बागल, कुणाल देवकर, गोपाल राजपूत, निरंजन पाटील, वैभव शेजवळ, संदीप एकबोटे, आदित्य हाटगे यांनी मेहनत घेतली.



**नवी मुंबई : सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत आणि पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका अरुणा भगत यांच्या नेतृत्वाखाली कामोठे सेक्टर २२ मधील सोसायटीच्या प्रतिनिधी मंडळाने पाणी प्रश्नाविषयी बेलापूर येथील सिडको कार्यालय येथे चौटानी यांची भेट घेतली. या वेळी योग्य ती कारवाई करू, असे लेखी आश्वासन त्यांनी दिले. भगत दाम्पत्य नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी तत्पर असतात. नागरिक त्यांच्याकडे एखादी समस्या घेऊन आल्यास त्या समस्येचे निराकरण केले जाते. यासाठी आवश्यक ते प्रयत्न व पाठपुरावा भगत यांच्याकडून केला जातो. सेक्टर २२ मधील पाणी प्रश्नाचीही भगत यांनी दखल घेऊन सिडको अधिकाऱ्यांची भेट घेतल्याने हा प्रश्न मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.**



**पनवेल : महिला दिनानिमित्त बुधवारी भाजप कळंबोली शहर मंडळ सरचिटणीस दुर्गावती सहानी यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर झाले. या शिबिराचा ३२ महिलांनी लाभ घेतला. शिबिरासाठी कळंबोली भाजपा कार्यालयीन चिटणीस जगदीश खंडेलवाल, कळंबोली महिला शहर मंडळ अध्यक्ष मनीषा निकम, उपाध्यक्षा प्रियांका पवार, उपाध्यक्षा कविता गुजर, उपाध्यक्षा उमा राव, उपाध्यक्षा आशा मल्हा, कळंबोली महिला मंडळ उत्तर भारतीय अध्यक्ष सरिता बसोने, सरस्वती स्वाईन आदी उपस्थित होते.**

## दुखवटा

### रामदास फडके



**पनवेल** : तालुक्यातील मोर्बे येथील रामदास महादेव फडके यांचे वयाच्या ६२व्या वर्षी शनिवारी (दि. ५) निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठे भाऊ, पत्नी व मुले असा परिवार आहे. रामदास फडके यांचा दशक्रिया विधी १४ मार्च रोजी श्रीक्षेत्र नाशिक येथे, तर उत्तरकार्य १७ मार्च रोजी राहत्या घरी होणार आहे.

### मोतीराम पाटील



**मुरूड जंजिरा** : तालुक्यांतील एकदरा येथील कोळी समाजाचे ज्येष्ठ नेते व गावचे प्रमुख मोतीराम पाटील यांचे नुकतेच निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते. त्यांनी जय हनुमान मच्छीमार सोसायटी एकदराचे ते २२ वर्षे सचिव तर २३ वर्षे चेअरमन पद भूषविले होते. मुरूड लोक न्यायालयातही त्यांनी सलग १२ वर्षे पंच म्हणून उत्तम कामगिरी पार पाडली. रायगड जिल्ह्यातील पहिली एक कोटींची पथदर्शी पाणी पुरवठा योजना त्यांनी एकदरा ग्रामस्थांना मिळवून दिली.त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

पान १ वरून

## नवाब मलिक हटाओ, महाराष्ट्र बचाओ!

मुंबई बॉम्बस्फोटाचा सूत्रधार दाऊद इब्राहिम व अंडरवर्ल्डशी संबंधित अन्य आरोपींकडून जमिनीचा व्यवहार केल्याचा आरोप मंत्री नवाब मलिक यांच्यावर आहे. सध्या ते ईडीच्या कोठडीत आहे. त्यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्ष भाजपने लावून धरली आहे, पण राज्य सरकार मलिकांचा राजीनामा घ्यायला नकार देत आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपने बुधवारी मुंबईतील आझाद मैदानावर भव्य मोर्चा काढला होता. या मोर्चात नेते, पदाधिकाऱ्यांसह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी उपस्थितांना संबोधित करताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना लक्ष्य केले. राज्याचे प्रमुख सत्तेसाठी लाचार झाले असल्याची घणाघाती टीका फडणवीसांनी केली.

आम्ही मंत्री नवाब मलिक यांचा राजीनामा मागतोय, पण राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री सगळे जण एका सुरात सांगत आहेत की, आम्ही मलिकांचा राजीनामा घेणार नाही. ज्याने १९९३मध्ये मुंबईत बॉम्बस्फोट करून मुंबईकरांच्या चिंधड्या केल्या त्याचा माणूस आज ठाकरेंच्या मंत्रिमंडळात आहे. एक दिवस उद्धवजींना बाळासाहेबांना याचे उत्तर द्यावे लागणार आहे. मी सांगेन बाळासाहेब मी संघर्ष केला, पण उद्धवजी तुम्ही बाळासाहेबांना काय उत्तर देणार, अशा शब्दांत फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर आसूड ओढला.


आमचा संघर्ष देशद्रोह्यांविरोधात आहे, दाऊदच्या साथीदारांविरोधात आहे. भारतमातेसाठी ज्यांनी बलिदान दिलेय त्यांच्यासाठी आम्ही लढणार. म्हणूनच मलिकांचा राजीनामा आम्ही मागतोय. आम्ही वाकणार नाही, झुकणार नाही. जर सरकारने मलिकांचा राजीनामा घेतला नाही, तर संघर्ष अटळ आहे, असा इशाराही फडणवीस यांनी या वेळी दिला.

आझाद मैदानामधून मेट्रो सिनेमागृहामार्गे हा मोर्चा विधानभवनाकडे जाण्यास निघाला असता पोलिसांनी मोर्चाचे नेतृत्व करणारे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची वाट अडवून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्यापाठोपाठ विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, आमदार आशिष शेलार आणि भाजपचे अन्य नेतेही पोलीस व्हॅनमध्ये चढले. काही वेळानंतर या सर्व नेत्यांना पोलिसांनी सोडून दिले.

या मोर्चात रायगड जिल्ह्यातून भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, मिलिंद पाटील, श्रीनंद पटवर्धन, युवा नेते अमित घाग, उरण शहर अध्यक्ष व नगरसेवक कौशिक शाह, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष शेखर पाटील, उपनगराध्यक्ष जयविंद कोळी, कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, दीपक बेहेरे, रमेश मुंढे, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, माथेरानचे उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, युवा नेते किरण ठाकरे, मुरूड तालुका अध्यक्ष महेंद्र चेऊलकर, रोहा अध्यक्ष सोपान जांभेकर, पेण अध्यक्ष श्रीकांत पाटील, पनवेलचे ज्येष्ठ नेते सुनील घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, खालापूरचे तालुका अध्यक्ष रामदास ठोंबरे, सल्लागार पंकज शाह, खोपोलीचे शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अजय इंगुळकर, विजय तेंडुलकर, प्रमोद पिंगळे, गोपाळ बावस्कर, सुनील नांदे, राहुल जाधव, संजय म्हात्रे यांच्यासह जि.प., पं.स. सदस्य, नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## महाड एमआयडीसीतील सांडपाणी वाहिनीच्या दुरुस्तीस विलंब

या प्रश्नावर राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी लेखी उत्तरात सांगितले की, महाड औद्योगिक वसाहतीतील सांडपाणी वाहिनी जुनी व जीर्ण झाली असल्याने त्यामधून काहीवेळा गळती होते व त्यामुळे प्रक्रिया केलेले पाणी शेतात शिरून शेतीचे नुकसान होण्याची शक्यता असते, तथापि या वाहिनी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात येते. ज्या शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले असेल अशा शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई अदा केली जाते, परंतु गेल्या वर्षभरात या क्षेत्रात अशी घटना घडलेली नाही. महाड औद्योगिक वसाहतीतील २४.२ किमी लांबीची सांडपाणी वाहिनी पूर्णपणे बदलण्यात येणार आहे व या कामासाठी सुमारे १५२ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असून खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे तसेच उद्योजकांच्या संघटनेने या कामावरील खर्चाच्या २५ टक्के रक्कम देण्याची तयारी दर्शविली आहे. २५ टक्के निधी, उद्योजकांना आकारण्यात येणाऱ्या सांडपाणी प्रक्रिया शुल्काद्वारे पुढील १० वर्षांत जमा होणाऱ्या निधीतून उपलब्ध करून दिला जाणार आहे.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. १० मार्च २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
■ २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
■ ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
■ ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

कोव्हॅक्सिन

■ ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
■ ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
■ ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
■ १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
■ ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
■ १२. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षावरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No. (02145) 222167**
**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक १०७ सन २०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविल्या आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पैठण कोतवाल बुदुक ते दाभाट धनगरवाडी ते परसुले रस्ता प्रजिमा-१०८, कि.मी. ०/०० ते ७/०० (मजबुतीकरण व डांबरीकरण करणे). तालुका, पोलादपूर, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पुल, ०४ जिल्हा व इतर मार्ग)** | १६२५२१४० | १६०१७२११ | १५०००० | ११२०/- | १२ महिने | इतर |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ११/०३/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २५/०३/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापुर्व बैठक | मा. अधीक्षक अभियंता, रायगड सा. बां. मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक १५/०३/२०२२ वेळ १५.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा. बां. मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक २९/०३/२०२२ वेळ १२.०० वाजता |

टिप:- परिपुर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१११
दिनांक : ०८/०३/२०२२

सही/-
(एम. आर. नामदे)
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येत आहे की, मौजे चिंचवली शेकीन, ता. खालापुर, जि. रायगड, महाराष्ट्र राज्य येथील मेसर्स कामधेनु कार्पोरेशनचे भागीदार १) श्री. लखमशी शामजी पटेल, पत्ता : अ-९०३, निलकंठ टॉवर, मखमली तलाव, एलबीएस रोड, ठाणे(वेस्ट) ४००६०१, २) श्री. रतीलाल शामजी पटेल, पत्ता : ४०२, बाबासाहेब जोशी पंथ, फडके रोड डोंबिवली (ईस्ट), ४२१२०१, ३) श्रीमती. सविता शांतीलाल पटेल, पत्ता : २४, मेघजी मेंन्शन, जेठाबाई लेन, घाटकोपर (ईस्ट) ४०००७७, ४) श्री. करसन कानजी पटेल, रा. ७, श्रीनिवास, एलबीएस रोड, घाटकोपर (वेस्ट) ४०००८६, ५) श्री. धर्मेश करसन पटेल, रा. ७, श्रीनिवास, एलबीएस रोड, घाटकोपर (वेस्ट) ४०००८६, ६) श्री. हितेश रतनशी पटेल, रा. ७, श्रीनिवास, एलबीएस रोड, घाटकोपर (वेस्ट) ४०००८६, ७) श्री. विनय जेठालाल पटेल, रा. ३, व्हिनस रेजन्सी को.हौ. सोसायटी, नवरोजी लेन, घाटकोपर (वेस्ट) ४०००८६, ८) श्री. प्रशांत वाडीलाल पटेल, रा. सी-३०२, पदमावती नगर, मुलंड (वेस्ट) ४०००८०, ९) श्री. निशांत नागिनदास पटेल, वय ३१ वर्षे, रा. डी-५०४, पदमावती नगर, मुलंड (वेस्ट) ४०००८०, १०) श्री. दिपकपर्बत पटेल, रा. बी-४०२, सिल्वर हारमोनी, घाटकोपर (वेस्ट) ४०००८६, ११) श्री. मिनाक्षी दिपकपटेल, वय ५२ वर्षे, रा. बी-४०२, सिल्वर हारमोनी, घाटकोपर (वेस्ट) ४०००८६, १२) श्री. अरूण रावजी भगत, रा. अ १-१२०२, निळकंठ व्हॅली, कोलशेत, ठाणे, ४००६०८, यांच्या मालकी हक्काची व ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत/भुखंड आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन :**
मौजे चिंचवली शेकीन, ता. खालापुर, जि. रायगड

| भुमापन क्रं. | भुखंड क्रं. | सि.स. नं. | भुखंडाचे क्षेत्रफळ | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| ५४/२+५७/२ | १ | १६६५/१६६८/१ | ५५९ चौ.मी | २२.०९ |
| ५४/२+५७/२ | २ | १६६५/१६६८/२ | ५१६ चौ.मी | १९.२० |

तरी सदरहु जागा, जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, विकासनकरार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, संपादन, भाडेपटटा, साठेकरार, लिज, तबदली, ट्रस्ट, मृत्युपत्र, विक्रीचा करार, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी, ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन पंधरा (१५) दिवसांच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर, सक्षम वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती हया निर्वेध व बोजाविरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडुन दिली आहे असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे आशिल हे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

दिनांक : १०.०३.२०२२

**सही/-**
**ॲड. मनीषा पवार**
**पत्ता : २०१,प्रॉक्सीमा बिल्डींग,**
**सेक्टर ३०अ, प्लॉट नं. १९, वाशी, नवी मुंबई**
**मोबाईल : ८०८०८१९३१६**

# महिला पोलिसांना आठ तास ड्युटी

## पोलीस आयुक्तांची महिला दिनी अनोखी भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला दिनानिमित्त नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात झालेल्या कार्यक्रमात महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना आठ तास ड्युटी केल्याची घोषणा पोलीस आयुक्तांनी केली. त्यामुळे कौटुंबिक जबाबदारी सांभाळून कर्तव्य बजावणाऱ्या महिला पोलिसांना दिलासा मिळाला आहे.


(प्रातिनिधीक छायाचित्र)

महिला दिनानिमित्त महिला पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांनी जनजागृतीपर दुचाकी रॅलीचे आयोजन केले होते. या वेळी वाहतूक नियमांचे महत्त्व आणि त्याविषयी जनजागृती करण्यात आली. विशेष दुचाकी रॅली परिमंडळ एक आणि दोनमधून काढण्यात आली.

पोलीस आयुक्तालयातील १०० पेक्षा अधिक महिला कर्मचारी व अधिकाऱ्यांनी या दुचाकी रॅलीमध्ये सहभाग घेतला होता. याबाबत माहिती देताना, महिला पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांना फक्त ८ तासांची ड्युटी लागू करण्यात असल्याचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी जाहीर केले. तसेच महिला दिनानिमित्त सर्व पोलीस नवी मुंबईतील सर्व पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदभार महिला पोलिसांकडे देण्यात आला होता.

याशिवाय शहरातील १० पेक्षा अधिक आणि सर्वात व्यस्त वाहतूक नियंत्रक येथील वाहतूक नियंत्रण महिला पोलिसांच्या हाती सोपवण्यात आले. विविध उपक्रम राबवत महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

**“ महिला दिनाचे औचित्य साधून या पुढे महिला पोलीस अधिकारी कर्मचारी यांचे कार्यालयीन तास केवळ आठ तासांचे असणार आहेत. या निर्णयांनी त्यांच्यातील आत्मविश्वास वाढून अधिक कार्यक्षमतेने काम करतील. महिला पोलीस म्हणूनही कुठेही कमी नाही हा विश्वास आम्हाला आहे.**
**-बिपीनकुमार सिंह, पोलीस आयुक्त, नवी मुंबई**

परिमंडळ एकमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक-मोराज सर्कल-पाम बीच-खारघर चौक अशी काढली. तर परिमंडळ दोनमध्ये सीबीडी उत्सव चौक ते ग्रामविकास भवन कळंबोली सर्कल पनवेल बस स्थानकापर्यंत रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

## तहसील कार्यालयातर्फे लाभार्थ्यांना धनादेश वाटप

**पनवेल : वार्ताहर**

तहसीलदार कार्यालयात महिला दिनाच्या कार्यक्रमांतर्गत संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य योजना, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत एकूण ९ लाभार्थ्यांना १ लाख ८० हजारांच्या धनादेशाचे वाटप तहसीलदार विजय तळेकर यांचे हस्ते करण्यात आले.

या वेळी योजनांबाबत नायब तहसीलदार एकनाथ नाईक यांनी योजनांची माहिती दिली. संजय गांधी योजना, श्रावणबाळ योजना, विधवा, वृद्धापकाळ योजनेच्या पात्र ५३ पात्र लाभार्थ्यांना एकुण ५५ हजार ६०० रूपये रक्कम मंजूर झाली असून उपस्थित विधवा व अपंग महिला २५ लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मंजुरीचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. तसेच केंद्र शासनाचे राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत १८ ते ५९ वर्षे वयाच्या कुटुंबातील कर्त्या पुरूषाचा मृत्यू झाल्यास कुटुंबाला राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेचा लाभ दिला जातो.

या योजनेअंतर्गत पात्र मंजूर ९ लाभार्थ्यांना प्रतिलाभार्थी रक्कम रूपये २० हजार याप्रमाणे एकूण रक्कम रूपये १ लाख ८० हजाराचे धनादेश तहसीलदार विजय तळेकर यांचे हस्ते वितरीत करण्यात आले आहेत.

## निवडक



### चिरनेर स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांची सहल

**उरण :** सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपची सहल ५ आणि ६ मार्च रोजी मोठ्या उत्साहात झाली. चिरनेर, भोम, कळंमबुसरे, मोठी जुई येथील २७ जण या सहलीत सहभागी झाले होते. सहलीच्या सुरुवातीला श्री गुरुदत्त प्रासादिक भजन मंडळ मोठी जुई यांनी हरिनामाच्या गजरात निरोप देऊन सहलीचा आनंद द्विगुणित केला. या ग्रुपचे ॲडमीन पत्रकार मिलिंद खारपाटील यांचा ५२ वा वाढदिवस महावीर चक्राने सन्मानित सुभेदार कृष्णाजी सोनावणे यांचे सुपुत्र उद्योजक रमेश सोनावणे यांच्या कुटुंबीयांसोबत म्हसळा येथे साजरा करण्यात आला. दिवेआगार येथील सुवर्ण गणेश मंदिरात बोर्लीपंचतनचे सरपंच गणेश पाटील यांनी या ग्रुपचे स्वागत केले.



### पत्रकार मंचतर्फे उद्योजिकेचा सन्मान

**पनवेल** : तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ऋतुजा महामुनी यांचा सन्मान सोमवारी (दि. ७) पळस्पे येथील ऋतुजाज् नट्स झोन या फॅक्टरीमध्ये झाला. ऋतुजाने पत्रकारितेला अलविदा करून काजूचा कारखाना सुरू करण्याचा निर्णय घेतला. या सत्कारामुळे एक अनामिक ऊर्जा प्राप्त झाल्याचे त्या म्हणाल्या. या वेळी मंचाचे अध्यक्ष माधव पाटील, सरचिटणीस मंदार दोंदे, विवेक पाटील, संजय कदम, अविनाश कोळी, सुनील राठोड आदी उपस्थित होते.



### उरणमध्ये ब्रम्हाकुमारी विद्यालय सुरू

**उरण :** प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पनवेल अंतर्गत उरण येथील पालवी हॉस्पिटल समोर अयोध्या बिल्डींगमध्ये ब्रम्हाकुमारीचे विद्यालय (पाठशाळा) नुकतेच सुरू करण्यात आले आहे. शाळेचे उद्घाटन प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय पनवेलच्या तारादिदी, माजी नगराध्यक्ष अनंत गायकवाड, भानुशाली जैन आदींच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डिम्पल सेवक, शकुंतलादिदी, महेश पाटील, राजेश शाह, लक्ष्मण सेवक आदी मान्यवर उपस्थित होते. या शाळेत आध्यात्मिक ज्ञान, राजयोग मेडिटेशन मोफत शिकविले जाते, ज्यामुळे आपले जीवन तणावमुक्त होऊन खरी सुख शांतीची अनुभूती येते, असे प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय पनवेलच्या प्रमुख तारादिदी यांनी सांगितले.



### गव्हाण विद्यालयात महिला दिन उत्साहात

**गव्हाण** : जागतिक महिला दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत जुनिअर कॉलेजमध्ये विद्यालयातील सर्व महिला अध्यापिकांचा सन्मान प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. कार्यक्रमास उपप्राचार्य जगन्नाथराव जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, उपशिक्षक सागर रंधवे, विद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख सागर रंधवे तसेच विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे यांच्यासह ज्योत्स्ना ठाकूर, चित्रलेखा पाटील, योगिता पाटील, वृषाली मात्रे, ज्योती माळी, द्रोपदी वर्तक, हर्षला पाटील, प्रणाली पाटील, उज्वला म्हात्रे, उर्मिला गोंधळी, अस्मिता पाटील,संपदा म्हात्रे, प्रा. जयवंती ठाकूर व प्रा. अर्चना पाटील आदींसह विद्यार्थिनी प्रतिनिधी सिद्धी घरत हिचाही सत्कार करण्यात आला.

# महिलांनी एकजुटीने संघशक्ती उभी करावी-रत्नप्रभा घरत

## गव्हाण विद्यालयात माता-पालक मेळावा

**गव्हाण : वार्ताहर**

महिलांनी एकजुटीने वज्रमूठ बांधून संघशक्ती उभी करावी, असे आवाहन पनवेल तालुका पंचायत समिती सदस्या व भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी केले.



बुधवारी (दि. ८) रोजी सायंकाळी उशिरा रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या माता-पालक मेळाव्यात त्या बोलत होत्या.

या मेळाव्यास विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, ग्रामपंचायतीच्या सदस्या योगिता भगत, शिल्पा कडू, कामिनी कोळी, उषा देशमुख, सुनिता घरत, गिरिजाबाई कातकरी, प्रतिभा भोईर, लीना पाटील, वर्षा नाईक, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या प्राचार्या मुक्ता खटावकर, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या प्रणिता गोळे, न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या एस. सी. म्हात्रे, विद्यालयाच्या महिला शिक्षकांच्या प्रतिनिधी द्रोपदी वर्तक, मनिषा ठाकूर, सुनिता कांबळे तसेच माता-पालक संघाच्या सचिव ज्योती माळी, पालक उपस्थित होते. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक सुनील गावंड यांनी संगीतबद्ध केलेले महिलांचे सन्मान करणारे गीत विद्यार्थ्यांनी सादर केले.

या वेळी कर्तृत्ववान महिलांचा सन्मानही करण्यात आला. विद्यालयातील उपक्रमशील उपशिक्षिका हर्षदा पाटील यांनी दिग्दर्शित केलेला 'उंच माझा झोका' हा विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांच्या व्यक्तिरेखा साकारणारा कार्यक्रम बालकलाकारांनी सादर केला. विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.

## महिला दिनानिमित्त डाएट मॅनेजमेंट सेमिनार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय आणि न्यू इंग्लिश स्कूल ओवेपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाचे औचित्य साधून डाएट मॅनेजमेंटबाबत सेमिनार पार पडला.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या आहारतज्ज्ञ कोमल कुलकर्णी यांनी निरोगी जीवनशैली व आहार कसा असावा, हे सांगितले. त्याचबरोबर त्यांनी महिलासंबंधित असलेले आजार आणि त्यावर कसा आहार घ्यावा याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्राचार्य दुर्गादेवी मौर्या, पर्यवेक्षिका वीणा यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. गडदे यांनी उपक्रमाबद्दल कौतुक केले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात महिला दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन महिला विकास कक्षाद्वारे करण्यात आले. या कार्यक्रमात कार्यक्रमाची संकल्पना, महिलांबद्दल समाजाचे सर्व प्रकारचे पूर्वग्रह मोडून काढणे यावर आधारित व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद लाभला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून भारतीय रक्षा विभागातील थळ, जल व वायुसेनेचे उच्चपदस्थ अधिकारी लाभले. त्यामुळे उत्साह दिवगुणित झाला. प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत केले.

## युक्रेनवरून सुखरूप परतलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका आणि पनवेल तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमानातून मंगळवारी (दि. ८) पनवेल क्षेत्रातील युक्रेनवरून सुखरूप परतलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



या वेळी उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, तहसीलदार विजय तळेकर, नायब तहसीलदार राहूल सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

रशिया आणि युक्रेन यांच्यांमधील युद्धाचा फटका हा केवळ त्या देशांनाच नाही तर त्या ठिकाणी शिक्षणासाठी गेलेल्या भारतातील विद्यार्थ्यांनाही बसला आहे. भारत सरकारने विद्यार्थ्यांना सुखरूप आणण्यासाठी ऑपरेशन गंगा सुरू केले आहे. या अंतर्गत पनवेल क्षेत्रातील विद्यार्थ्यांना सुखरूप आणण्यात आले आहे. या वेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी युक्रेनवरून आलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी केली. या विद्यार्थ्यांनी त्यांना आलेले हृदयद्रावक अनुभव सांगितले.

## प्रलंबित मागण्यांसाठी भाजप बेस्ट कामगार संघाचे निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बेस्ट कामगारांचा वेतन करार मार्च २०२१ ला संपलेला आहे. मागील कराराची थकबाकी अजूनही कामगारांना मिळालेली नाही. या मागणीसाठी भाजप बेस्ट कामगार संघातर्फे बेस्टचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्रा यांना निवेदन देण्यात आले.

या वेळी संघाचे सरचिटणीस गजानन नागे, उपाध्यक्ष बबनराव बारगजे, उपाध्यक्ष आनंदा जरग, चिटणीस राजकुमार घार्गे व प्रतिक्षा नगर आगार अध्यक्ष संतोष काटकर उपस्थित होते. वेतन करारातील त्रुटी दूर करणे त्याचबरोबर वाहतूक विभागात बदल्यांचे अनधिकृत प्रकार सुरू आहेत. त्याला आळा घालण्याचे व नियमांनुसार प्रमोशन करणे या विषयावर चर्चा झाली. अभीलेखकांना पाच दिवसांचा आठवडा करावा, याबाबत उपाध्यक्ष बबन बारगजे यांनी मुद्दा मांडला.

महाव्यवस्थापक लोकेश चंद्रा यांनी याबाबत कर्मचारीय व्यवस्थापक रवी शेट्टी यांना लक्ष घालण्याबाबत सूचना केली. त्याचबरोबर कामगारांच्या अनेक असुविधा व त्यावर चर्चा करण्यात आली. कामगारांच्या रहिवासी वसाहतीमधील दुरूस्तीबाबत गजानन नागे यांनी मुद्दा मांडला.



# १०४ वर्षीय आजीबाईंच्या हाती पोलीस ठाण्याचा कार्यभार

## महिला दिनी रसायनी पोलिसांकडून अनोखा उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्यात जागतिक महिला दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. जांभिवली येथील हभप वेणुबाई मारुती कोंडीलकर (वय १०४) यांना एक दिवसाचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बनविण्यात आले.


(छाया : राकेश खराडे)

मोहोपाडा माणिक प्रबळ शाळेतील विद्यार्थ्यांना रसायनी पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस ठाण्यात कामकाज कसे चालते, पोलिस कोठडी, शस्त्रास्त्रांच्या वापरावर माहिती देण्यात आली.

रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांनी, मोहोपाडा येथील माणिक प्रबळ शाळेतील विद्यार्थ्यांना महिला दिनाचे महत्त्व सांगून पोलीस ठाण्यातील कामकाजाची माहिती दिली. तसेच विद्यार्थी व महिलांसाठी संगीत खुर्ची, लिंबू चमचा, चित्रकला आदी स्पर्धा घेण्यात आल्या. यानंतर एक दिवसासाठी चार्ज १०४ वर्षीय आजीबाईंकडे सुपूर्द केला.

■ *हभप वेणुबाई कोडिंलकर यांनी २१ वेळा पंढरपूर पायी दिंडी तर २५ वेळा आळंदी पायी दिंडी केली आहे. त्यांना वयाच्या १०४ व्यावर्षी रसायनी पोलीस ठाण्याचा प्रभारी पोलीस निरीक्षक म्हणून खुर्चीत बसण्याचा मान मिळाल्याने त्यांनी आपल्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असल्याचे सांगितले.*

प्रभारी पोलीस निरीक्षकाचा मान मिळाल्याने आजीबाई भारावून गेल्या. त्यांनी हरिनामाच्या ओव्या, पोवाडा गायला. या वेळी प्रभारी पोलीस निरीक्षक आजीबाईंना रसायनी पोलीस ठाण्याच्या वतीने साडी चोळी, पुष्पगुच्छ व गोड पदार्थ भेट देण्यात आली. आजीबाईंनी यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना भरभरून आशिर्वाद दिले.

## संपादकीय

# व्हिडीओ बॉम्बचे हादरे

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केलेले आरोप पुराव्यासह असल्यामुळे त्यांना सडेतोड उत्तर देणे महाविकास आघाडीला कठीण जाणार आहे. फडणवीसांच्या आरोपांना गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील गुरुवारी सभागृहात उत्तर देणार आहेत. या वेळी 'दूध का दूध, पानी का पानी' होईल अशी प्रतिक्रिया त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. ते म्हणतात त्याप्रमाणे या संपूर्ण प्रकरणाचे स्पष्टीकरण महाराष्ट्राच्या जनतेला मिळायलाच हवे. ते राज्य सरकारचे नैतिक कर्तव्यच आहे.

**विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी भर विधिमंडळ सभागृहात फोडलेला महाशक्तिशाली व्हिडीओ बॉम्ब सत्ताधारी महाविकास आघाडीला हादरवून टाकणारा ठरला आहे. या बॉम्बचे पडसाद फक्त मुंबईच नव्हे; तर संपूर्ण राज्याच्या राजकारणात वारंवार उमटत आहेत. तब्बल सव्वाशे तासांचे रेकॉर्डिंग असलेला पेन ड्राइव्ह विधिमंडळ सभागृहाच्या अध्यक्षांकडे सुरूवातीलाच सोपवत फडणवीस यांनी मंगळवारी घणाघाती भाषण करीत सत्ताधाऱ्यांच्या अब्रूचे अक्षरश: धिंडवडे काढले. सरकारी वकिलांच्याच कार्यालयात कट-कारस्थाने रचली जात असून सरकारी अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांच्या साह्याने खुद्द सरकारच लोकशाहीविरोधी कट-कारस्थानांना खतपाणी घालत आहे. इतकेच नव्हे तर राज्य सरकार स्वत:च हे षडयंत्र रचत आहे असा आरोप फडणवीस यांनी केला. निव्वळ हवेतले आरोप त्यांनी केले नाहीत, तर त्याचे व्हिडीओ पुरावे त्यांनी सादर केले. फडणवीस यांच्या सरबत्तीपुढे सारे सभागृह स्तब्ध झाले होते. सत्ताधाऱ्यांच्या बाकांवर तर स्मशानशांतता पसरली होती. हा व्हिडीओ बॉम्ब फोडण्यासाठी फडणवीस यांनी शोधून काढलेला मुहुर्त मोठा नामी होता. सध्या गजाआड असलेले अल्पसंख्याकमंत्री नवाब मलिक यांच्या राजीनाम्याचा मुद्दा ते पुन्हा एकदा सभागृहात उपस्थित करतील अशी अटकळ होती, परंतु त्यांनी मलिक यांच्या राजीनाम्याची मागणी केलीच व त्याशिवाय सरकारी कट-कारस्थानांचा पर्दाफाशदेखील केला. फडणवीस यांच्या आरोपांच्या आधीच शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी शिवसेना भवनात पत्रकार परिषद घेऊन सक्तवसुली संचलनालयाच्या चार अधिकाऱ्यांच्या विरोधात खळबळजनक आरोप केले होते. नवाब मलिक यांना वाचवण्याच्या प्रयत्नात सत्ताधाऱ्यांनी दिवसभर केलेली शेरेबाजी संध्याकाळी फडणवीस यांच्या भाषणानंतर त्यांच्यावरच उलटली. विरोधी पक्षनेत्यांच्या पुराव्यासह केलेल्या आरोपांना गृहमंत्र्यांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवारीही उत्तर दिले नाही. त्यासाठी महाविकास आघाडीने कितीही वेळ घेतला तरी समाधानकारक उत्तर देणे कठीणच जाईल असे दिसते. त्याचे प्रत्यंतर बुधवारी दिवसभर येत होते. दररोज सकाळी पत्रकारांना सामोऱ्या जाणाऱ्या संजय राऊत यांनाही फडणवीस यांना चोख प्रत्युत्तर देता आले नाही. महाविकास आघाडीच्या ज्येष्ठ नेत्यांनीही जरा जपूनच प्रतिक्रिया दिल्या. राऊत यांच्या आरोपांचे सत्र फडणवीस यांच्या व्हिडीओ बॉम्बमुळे मंगळवारी अक्षरश: वाहून गेले, तर बुधवारी नवाब मलिक यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी भारतीय जनता पक्षाने काढलेल्या मोर्चाच्या वादळापुढे महाविकास आघाडीचा संपूर्ण प्रतिकारच कोसळून पडला. मलिक यांच्या राजीनाम्यानंतरही ही लढाई थांबणार नाही असा इशारा भाजपच्या नेत्यांनी आझाद मैदानात झालेल्या विशाल सभेत दिला असल्याने नजीकच्या भविष्यकाळात महाविकास आघाडी आणि विरोधी पक्षांमध्ये संघर्ष कमालीचा तीव्र होणार. राज्यातील शेतकऱ्यांचे, कामगारांचे, नोकरदारांचे आणि उद्योजकांचे प्रश्न राहिले बाजूला, आरोपांची ही राजकीय चिखलफेक महाराष्ट्राला योग्य दिशेने नेईल अशी आशा करूया.**

# पोलादपूरचे अविकसित आदिवासी जीवन



**खबरबात**
**शैलेश पालकर**

रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कातकरी उत्थान व सप्तसुत्री कार्यक्रमांतर्गत पोलादपूर तालुक्यातील सडवली गावातील समाज मंदिरामध्ये शुक्रवारी (दि. १८) सडवली, देवपूर, गांजवणे, खडपी, भोगाव, पैठण, कोंढवी येथील आदिवासी बांधवांकरिता कार्यक्रम झाला. तर पितळवाडी गावातील राधाकृष्ण मंदिराच्या सभागृहामध्ये मंगळवारी (दि. २२) केवनाळे, करंजे, साखर, देवळे येथील कातकरी महिला व पुरूषांचे एकत्रितपणे कातकरी उत्थान शिबिर घेण्यात आले. लोहारे, पार्ले, तुर्भे व दिविल येथील कातकरी बांधवांसाठी कातकरी उत्थानाचा तिसरा कार्यक्रम लोहारे येथील शंकर मंदिरामध्ये झाला. कापडे बुद्रुक, रानबाजिरे, चांभारगणी व आड या गावांसाठी चौथा कार्यक्रम गुरूवारी (दि. ३) कापडे बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयामध्ये झाला. या कार्यक्रमांची सांगता मंगळवारी (दि. ८) सवाद येथील शंकर मंदिरामधील कार्यक्रमाने झाली. यावेळी कातकरी उत्थान कार्यक्रमांतर्गत सवाद, माटवण आणि हावरे येथील आदिवासी वाड्यांतील कातकरी महिला व पुरूषांच्या विविध आरोग्य तपासण्या तसेच लसीकरणासह महसुल विभागाकडून देण्यात येणारे विविध दाखले, मनरेगा जॉब कार्ड तसेच कातकरी कुटूंबांच्या रेशनकार्ड संबंधित कामे करण्यात आली. मात्र खऱ्या अर्थाने जनगणनेबाहेरील लोकसंख्येला प्रवाहासोबत आणण्यासाठी राज्यसरकारच्या अनुभवी आणि उच्चशिक्षित प्रशिक्षित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

पोलादपूर तालुक्यातील आदिवासी जमातीची जीवन पध्दत अद्याप अविकसित आणि असंघटीत असल्याचे दिसून येत आहे. आदिवासी वाड्या, आदिवासी शाळा आणि आदिवासींची श्रमशक्ती हा तालुक्याच्या गतिमानतेचा अविभाज्य भाग असला तरी तो केवळ या जमातीच्या शोषणावरच अवलंबून आहे. त्यांचे घटनात्मक हक्क देण्यास अन्य समाज पुढाकार घेण्याऐवजी ते हक्क बळकाविण्यातच धन्यता मानतात.

**आरोग्यविषयक अनास्था**

पोलादपूर तालुक्यातील दुर्गम भागात डॉक्टर पोहोचत नसताना काही बोगस डॉक्टर्स मात्र कितीही दुर्गम भाग असला तरी तेथे पोहोचून रुग्णसेवेसाठी सज्ज असल्याचे दिसून येते. परिणामी, वैद्यकीय सेवेवरील विश्वासार्हतेपेक्षा त्यांची अनुपलब्धताच आदिवासी समाजातील वैदूंना उपचारासाठी संधी उपलब्ध करून देत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. ग्रामीण व आदिवासी भागात नालगूद, कावीण, धूपनी, धावरा, मोड, दमा, हातपाय सुजणे, कावीळ, अंगावरून जाणे, पोटदूखी, फोड येणे, हगवण, ताप, खोकला, सर्दी, वात, मुडदूस, जुलाब, लहान मुलांना डबा होणे, उलटी, खरूज अशा विविध आजारांवर उपचारांसाठी नाणेघोळ येथे खेळाजी वाघे, कृष्णा वाघे, कापडे येथे महादेव पवार, अनुसया पवार, नामदेव काळे, माटवण येथे रघुनाथ वाघमारे, मधु मुकणे, कोंढवी येथे मारूती मुकणे, सुरेश मुकणे, गांजवणे येथे बापूराम पवार, वनिता पवार, हावरे येथे अर्जून पवार, पैठण येथे बबन जाधव, पोलादपूर येथे सहदेव पवार, लिला पवार, लोहारमाळ येथे सायबू जाधव, सडवली येथे भगवान कोळी, लक्ष्मी कोळी, पार्ले येथे लल्या वाघमारे, वसंत वाघे, दत्ता पवार, कुशी मुकणे, देवपूर येथे चंद्रकांत निकम आणि आड येथे महादेव पवार आदी वैदूंकडे जातात, असे एका सामाजिक संस्थेच्या अहवालात निष्पन्न झाले आहे. यातही काही वैदू मोफत उपचार करीत असून गुरूंची तशी आज्ञा असल्याची सांगतात. अनेक डॉक्टर्स मात्र आदिवासी रुग्णांना परस्पर वाटेला लावतात, असा विरोधाभास तालुक्यात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. जून २०११ च्या मासिक अहवालातून मध्यम कमी वजनाची नऊ लाख ७३ हजार ६६७ बालके आणि तीव्र कमी वजनाची एक लाख २६ हजार २४० बालके राज्याच्या ग्रामीण भागात असल्याचे दिसून आले आणि त्याच वर्षी १६ ऑगस्टला महाड ग्रामीण रुग्णालयातच मध्यरात्रीच्या सुमारास उर्मिला शिऱ्या मुकणे या इयत्ता तिसरीतील आठ वर्षीय कुपोषित मुलीचा बळी गेला. या पार्श्वभूमीवर राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्रामअभियान हे तालुक्यासाठी महत्वपूर्ण आहे. तसेच एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत मुलांचे पोषण व आरोग्य स्थितीत सुधारणा करणे आणि बालमृत्यू रोखण्यासाठी या अभियानांतर्गत लसीकरण, आरोग्य तपासणी, संदर्भसेवा, पूरक पोषण आहार, महिलांचे आरोग्य व पोषण तसेच पूर्व प्राथमिक शिक्षण अशा सेवांसोबत आदिवासींमध्येही जनजागृतीचे प्रयत्न होण्याची गरज आहे.

**संवर्धित वनांसाठी अनास्था**

पोलादपूर तालुक्यातील जंगल आणि इकोसेन्सेटिव्ह प्रदेशामध्ये वनौषधींची उपज निसर्गत:च आहे. आदिवासींना या वनौषधींचा वापर आणि पारख पूर्वापार आहे. आदिवासी केवळ जंगलातून पावसाळ्यात आळंब्या आणतात आणि उन्हाळ्यात ओले काजू, आंबे आणि फणस घाऊक व्यापाऱ्यापर्यंत पोहोचवून उदरनिर्वाह करतात, हा अलिकडील व्यापारी समज या समाजाला पूर्वापार व परंपरागत वनौषधी ज्ञानापासून दूर करण्यास कारणीभूत ठरला आहे. सोबतच तालुक्यातील वनजमिनीवरील वनौषधींचा ऱ्हास करणारी मातीचोरी व डोंगर सपाटीकरणाची यंत्रे वैदूंच्या सेवेवर अनिष्ट परिणाम करीत आहेत. त्यामुळे वनविभागाने पुढाकार घेऊन वनवासींसाठी संवर्धित वनांची संकल्पना अस्तित्वात आणण्याची गरज आहे.

पोलादपूर तालुक्यातील करंजा, रानघेवडा, जांभूळ, जंगली पडवळ, अडूळसा, घाणेरी, पांढरा केवडा, हिरडा, बेहडा, तिसंल, गुलाबजांबू, घोळ, वासनवेल, रानकपास, चिकणा अतिवळा, चौचण, चिरफळ, निबारा, कोसिब, कोबी, नाना नाग्या, शिमली, सहदेवी, पापडी, गोरखमुंड, भृंगराज, माका, कंबरमोडी, काटेसावरी, अमरूल, मुरूडशेंग, जंगलीभेंडी, जास्वंद, पिवळा धोतरा या वनस्पती आता फारच दूर्मिळ झाल्या असून केवळ वड, पिंपळ, औदूंबर, तीळ, मेंदी, गुलराम, कारवी, पिवळी कोराटी, रक्तलोहित, वारस, रानपोपटी, नांदूर, फणस, आंबा, रानफणस,बोगनवेल, एरंड, चंदन, आसाणा, केकतड, खुड्यानाग, रामदातून, घोटवेल, केव्हे, माड, नागरमोथा, साग, ब्रह्मदांडी, संकेश्वर अनानीवेल, उपरसाल, रूई, तुळतुळी, किंजळ या वनौषधींचा साठा तालुक्यातील रेडेखाचर, दत्तवाडी, तुर्भेखोंडा, हावरे, वाकण, ढवळे, बोरघर, किनेश्वर, कुडपण, परसुले, काटेतळी, सडवली आदी भागांतील जंगलामध्ये मुबलक प्रमाणात आढळून येत आहे. काही वर्षांपूर्वी या वनौषधींची आदिवासींकडून अन्य भागातील फुटकळ व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात विक्री होत असे. मात्र, त्याकामी मिळणारा मोबदला फारच अत्यल्प असल्याने आदिवासींनी ही विक्री बंद केली. आता स्थानिक वैदूंना या वनौषधींचा शोध घेताना त्या दूर्मिळ झाल्याचे दिसून आले आहे. याचा परिणाम, एकेकाळी तालुक्यातील वैदूंची प्रभावी ठरलेली आरोग्य उपचारपध्दती वनौषधीअभावी निष्प्रभ ठरू लागली असून रूग्णांना गुण न आल्याने डॉक्टरांकडे जाणे अपरिहार्य ठरत आहे.

**जीवन असंघटीत**

दारूचे दुष्परिणाम, बालविवाह, अंधश्रध्दा यामुळे समाजाचे आणि आदिवासी कुटूंबाचे विशेषत: महिलांचे होणारे नुकसान याबाबत समाजप्रबोधन करणाऱ्या यंत्रणा पोलादपूर तालुक्यात अस्तित्वातच नाहीत. त्यामुळे पोलादपूर तालुक्यातील आदिवासी समाज अविकासित आणि असंघटित राहात असून माणूस म्हणून जगण्याच्या संघर्षात त्यांची झेप आता आला दिवस जगण्याच्या मरगळीत बदललेली दिसून येत आहे.

# कर्जत, नेरळ, खालापूर पोलीस ठाण्यात 'महिलाराज'



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महिलांचा सन्मान करण्यासाठी पोलीस दलाने मंगळवारी (दि. ८) सर्व कारभार महिला पोलिसांच्या हाती दिला होता. कर्जत आणि नेरळ पोलीस ठाण्यात महिला पोलिसांनी अगदी चोख कामकाज करीत सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्याचे काम केले.

कर्जतच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ठाण्यामधील सर्व कामकाज महिला कर्मचाऱ्यांनी पाहिले. त्यात ठाणे अंमलदार म्हणून हवालदार स्वाती मसगुडे यांनी तर वायरलेसची जबाबदारी पोलीस शिपाई पूनम ढोमे यांनी पार पाडली. यावेळी सीसीटीएनएस प्रणालीवर पोलीस नाईक संजना सांगळे यांनी तर दामिनी पथकाची जबाबदारी पोलीस शिपाई जया खंडागळे यांनी सांभाळली. गोपनीय विभाग पोलीस शिपाई श्रुती भोईर यांनी तर शहर आणि परिसरातील बंदोबस्त पोलीस हवालदार संचिता सानप, पोलीस नाईक दीपा खडे, पोलीस शिपाई ज्ञानिवंता बारोळे आणि स्वाती चिरमे यांनी सांभाळला.

नेरळ पोलीस ठाणे आणि कळंब आऊट पोस्ट पोलीस ठाणे येथीलही सर्व कामकाज महिला पोलिसांच्या हाती होते. नेरळ पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी म्हणून उपनिरीक्षक माधुरी मुळीक यांनी काम पाहिले. ठाणे अंमलदार म्हणून पोलीस नाईक अनघा पाटील, सीसीटीएनएस प्रणालीवर पोलीस शिपाई सोनू मेश्राम यांनी तर वायरलेसची सेवा पोलीस शिपाई जयाबाई सांगळे यांनी सांभाळली. दामिनी पथकाची जबाबदारी पोलीस शिपाई प्रीती वर्तक आणि वर्षा पाटील यांनी तर लॉकअप बंदोबस्ताची जबाबदारी पोलीस शिपाई मोहिनी वाघमोडे, पोलीस नाईक रुतीका कदम आणि पुष्पा वाघमारे यांनी यशस्वीपणे सांभाळली. कळंब येथील आऊट पोस्टवरील प्रभारी म्हणून पोलीस हवालदार विद्या राठोड यांनी काम पाहिले.

नेरळ पोलीस ठाणे आणि विद्या विकास शाळेच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त गावात प्रभातफेरी काढली होती. यावेळी महिला दक्षता समितीच्या सदस्या सुमन लोंगले, कल्पना हिलाल आणि रेखा हिरेमठ यांनी महिला पोलीस अधिकाऱ्यांचे कौतुक केले.



(छाया : अरूण नलावडे)

**खालापूर : प्रतिनिधी**

महिला दिनानिमित्त खोपोली पोलीस ठाण्याचा कारभार सांभाळण्याची जबाबदारी मंगळवारी श्रुती सागर शेवते या पोलीस कन्येला देण्यात आली होती. तर पोलीस उपनिरीक्षक सरला काळे यांच्यावर खालापूर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पदाचा कार्यभार सोपविण्यात आला आला होता.

खालापूर पोलीस ठाण्यातर्फे महिलांना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले तसेच महिला पत्रकार सारिका सावंत, सहजसेवा फाउंडेशनच्या इशिका शेलार, कराटेपटू शीतल गायकवाड, भक्ती साठेलकर यांच्यासह कर्तृत्ववान महिलांना गौरविण्यात आले. प्रभारी अधिकारी सरला काळे, खालापूरच्या नगराध्यक्षा रोशना मोडवे, मुख्याधिकारी रश्मी चव्हाण, दिपाराणी विभूते, शिवानी जंगम, सुप्रिया साळुंखे, वर्षा मोरे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लतिका गुरव यांनी केले.

## आरोग्य प्रहर

### मधुमेहाच्या रुग्णांना किडनीच्या आजारांचा अधिक धोका

किडनी हा आपल्या शरीराचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. किडनी लाल रक्तपेशीदेखील बनवते. तुमचे आरोग्य चांगले राहण्यासाठी किडनीची काळजी घेणे खूप गरजेचे आणि तितकेच महत्त्वाचे आहे. ज्या लोकांना मधुमेहाचा त्रास असतो. त्यांना किडनीचा आजार होण्याचा सर्वाधिक धोका नेहमीच असतो. अशा परिस्थितीत शरीरातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. ज्या लोकांना मधुमेह झाला आहे त्यांनी किडनीची नियमित तपासणी केली पाहिजे. किडनीच्या आजाराची लक्षणे कोणती आहेत आणि ते कसे टाळता येईल. याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात.



**किडनीच्या आजाराबद्दल डॉक्टर नेमके काय म्हणतात...**

डॉ. हिमांशू वर्मा, एचओडी, नेफ्रोलॉजी विभाग यांच्या मते किडनीशी संबंधित आजार केवळ लघवीद्वारे ओळखता येतात. लघवी करताना वेदना होत असतील, लघवीचा रंग बदलत असेल किंवा वारंवार लघवी होत असेल, तर हे किडनी संसर्गाचे लक्षण असू शकते. काही वेळा लोकांना पायांना सूज येते. भूक न लागणे आणि ओटीपोटात दुखणे हे देखील आहे. डॉक्टरांच्या मते ज्या लोकांची साखरेची पातळी नियंत्रणात नसते. त्यांना किडनीशी संबंधित आजारांचा धोका अधिक असतो.

डॉक्टरांच्या मते ४५ टक्के किडनीचे आजार मधुमेहाच्या रुग्णांना होतात. जे लोक पुरेसे पाणी पीत नाहीत त्यांनाही किडनीचा आजार होण्याची शक्यता असते. चुकीच्या आहार आणि जीवनशैलीमुळे अनेकांचे वजन आणि बीपी नियंत्रणात राहत नाही. त्यांना किडनीच्या आजाराचीही अधिक शक्यता असते. डॉ. हिमांशू यांच्या मते, किडनी निकामी होण्याशी संबंधित लक्षणांकडे दुर्लक्ष केले तर ते गंभीर स्वरूपाचे बनतात. गेल्या अनेक वर्षांपासून तरुणांमध्येही किडनीचे आजार आढळून येत आहेत आणि ही धोक्याची घंटा आहे.

**तेलकट पदार्थ खाणे पूर्णपणे टाळाच!**

डॉ. हिमांशू यांच्या मते किडनी निरोगी ठेवण्यासाठी लोकांनी जेवणात मीठ आणि तेलाचा कमी वापर करणे सर्वांत महत्त्वाचे आहे. वजन नियंत्रणात ठेवा. लठ्ठपणा वाढत असेल तर तो कमी करण्याचा प्रयत्न करा. रोज किमान आठ ते १० ग्लास पाणी प्या. वर्षातून किमान एकदा केएफटी करा. जर आपण जेवणामध्ये तेलकट आणि मीठ जास्त घेतले, तर वजन कमी करणे शक्य होत नाही. यामुळे वजन वाढते आणि धोकादेखील अधिक होतो.

# महाराष्ट्र राज युवा पत्रकार संघातर्फे सन्मान सोहळा

**नागोठणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज युवा पत्रकार संघातर्फे अनन्यसाधारण व्यक्तिमत्व सन्मान सोहळा २०२२चे आयोजन सोमवारी (दि. २१) सायंकाळी ६.३० वाजता नागोठणे येथील आठवडे बाजाराच्या मैदानात करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे, कामगार राज्यमंत्री बच्चूभाऊ कडू, माजी मंत्री व विद्यमान आमदार रविशेठ पाटील, आमदार भरत गोगावले, कोकण आयुक्त विलास पाटील, कोकण परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक संजय मोहिते, जि. प. सदस्य किशोर जैन, ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, नागोठणे सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, कुणबी समाजाचे रोहा अध्यक्ष शिवराम शिंदे, सर्वधारा जनआंदोलनाच्या संस्थापक उल्का महाजन, पं. स. सदस्य संजय भोसले, बिलाल कुरेशी, म. रा. यु. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष राज वैशंपायन, कायदेशीर सल्लागार अॅड. सुरेश माने, रोहा वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी अरुण शिर्के उपस्थित राहणार आहेत.

ख्यातनाम लोकगीत गायक जगदिश पाटील, सुप्रसिद्ध गायिका सोनाली भोईर, हर्षला पाटील, हास्यसम्राट फेम जॉनी रावत, बिग बॉस फेम गायक संतोष चौधरी (दादुस) यांचा गायनाचा कार्यक्रम हे या सन्मान सोहळ्याचे विशेष आकर्षण असणार आहे. या कार्यक्रमासह सन्मान सोहळ्याला सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष याकूब सय्यद, सचिव संदेश गायकर, खजिनदार प्रवीण बडे, मंजुळा म्हात्रे, श्वेता वैशंपायन, अॅड. स्वप्नील दिघे यांनी केले आहे.

**यांचा होणार सन्मान**

तानुबाई बिर्जे सर्वोत्कृष्ट निवेदिका पुरस्कार-वृषाली यादव (एबीपी माझा), सावित्रीबाई फुले सर्वोत्कृष्ट महिला पत्रकार पुरस्कार-स्वाती लोखंडे (न्यूज १८ लोकमत), डॉ. बाबसाहेब आंबेडकर सर्वोत्कृष्ट लेखक पुरस्कार-समाधान पाटील (दैनिक राम प्रहर), आचार्य अत्रे सर्वोत्कृष्ट स्तंभलेखक पुरस्कार-विनोद राऊत (मुंबई सकाळ), महात्मा फुले सर्वोत्कृष्ट सामाजिक पत्रकार पुरस्कार-मिलिंद तांबे (मुंबई सकाळ), आचार्य बाळशास्त्री जांभेकर सर्वोत्कृष्ट उपसंपादक पुरस्कार-लक्ष्मण आढाव (रायगड टाइम्स).

**इतर उल्लेखनीय कामगिरी**

स्वरभूषण पुरस्कार-जगदिश पाटील, स्वरसरिता पुरस्कार-सोनाली भोईर, स्वरसागर पुरस्कार-संतोष चौधरी, स्वरसाधना पुरस्कार-हर्षला पाटील, पीटी उषा सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार-अभिलाषा म्हात्रे, दौलतराव शिंदे उत्कृष्ट खेळाडू-विवेक शिंदे, ध्यानचंद उत्कृष्ट क्रीडा संघटक-राजेश सुर्वे, आदर्श संपादक-शफी पुरकर, आदर्श शिक्षक-विजय देवकाते.

# अलिबागेत आरोग्य शिबिरास महिला पोलिसांचा प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस, माणुसकी प्रतिष्ठान, जिल्हा सामान्य रुग्णालय व सहवेदना ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबागमधील जंजिरा सभागृहात मंगळवारी महिला पोलीसांकारीता विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या हस्ते या आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यावेळी उपस्थित होते. डॉ. ओजास्विनी तांबोळी-कातेकर, डॉ. मेघा घाटे, डॉ. प्रतिभा म्हात्रे, डॉ. कीर्ती साठे, डॉ. कालिका देवकाते, डॉ. अश्विनी हुलवान, डॉ. अक्षय कोळी, डॉ. राजाराम हुलवान, डॉ. प्रज्योत पाटील यांनी महिला पोलिसांची आरोग्य तपासणी केली.



# म्हसळा तालुक्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील कामे ठप्प

## ग्रामस्थांच्या तक्रारींमध्ये वाढ

**म्हसळा : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर झालेली म्हसळा तालुक्यातील तीन रस्त्यांची कामे (एकूण लांबी सुमारे ६.५० किमी) गेल्या गेल्या ३-४ वर्षांपासून ठप्प आहेत. त्याविषयीच्या ग्रामस्थांच्या तक्रारीत वाढ झाली आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या दुसर्‍या टप्प्यामध्ये राज्यात १० हजार किमी ची कामे पूर्ण करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार म्हसळा तालुक्यातील ढोरजे-कुडतोडी, श्रीवर्धन राज्य मार्ग ते जांभूळ बौद्धवाडी, पाभरे-चाफेवाडी-चिचोंडा हे सुमारे ११.८०५ कि.मी. लांबीचे रस्ते योग्य कालावधीत पूर्ण झाले आहेत. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर झालेल्या म्हसळा तालुक्यातील सावर-चिरगाव-बौध्दवाडी (लांबी २.५०० किमी), पाष्टी-मोरवणे (लांबी दोन कि.मी), या रस्त्यांची कामे शासनाने २०१८-१९ मध्ये ठेकेदाराला दिली आहेत. मात्र ठेकेदाराने मागील तीन-चार वर्षात यापैकी कोणतेही काम सुरु केले नसल्याने ठेकेदार बदलण्याची मागणी पं.स. उपसभापती संदीप चाचले, सरपंच चंद्रकांत पवार, केतन आंग्रे यांच्यासह परिसरांतील ग्रामस्थ करीत आहेत.



(प्रातिनिधीक छायाचित्र)

> **तालुक्यातील घूम-रुदवट-पानवे या रस्त्याच्या ठेकेदारावर टर्मीनेशनची कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला आहे, त्याच्या मंजुरीनंतर अन्य प्रस्ताव सादर केले जातील**
> **-जसवंती आवारे, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना कार्यालय, माणगाव**

# 'पॉस्को' अंतर्गत इजिटेक कंपनीतील कामगार निलंबित

## न्याय्य हक्कासाठी आमरण उपोषणाचा इशारा

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील बिळे भागाड येथील पॉस्को कंपनी अंतर्गत इजिटेक या कंत्राटी कंपनीत गेली सात आठ वर्षे काम करणार्‍या १७ कामगारांना कोणतेही कारण न देता निलंबित करण्यात आले आहे. या अन्यायाविरोधात या कामगारांनी १४ मार्चपासून पॉस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वाराशेजारी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

इजिटेक कंपनी प्रशासनाने रुपेश जाधव, सुबोध ठाकूर, जगदीश पाशिलकर, निकुल पोळेकर, सुनील शिंदे, परेश जंगम, प्रशांत दिवेकर, भावेश जाधव, विशाल हर्णे, एकनाथ जांभरे, विवेक शिंदे, केतन भोसले, प्रणित म्हामुणकर, प्रणाल नलावडे, राहुल जोशी आदी १७ कामगारांना १७ डिसेंबर २०२१ रोजी कोणतेही कारण न देता निलंबित केले आहे. या कामगारांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गेल्या सात आठ वर्षांपासून कंपनीने आम्हाला बर्‍याच सुविधांपासून वंचित ठेवल्यामुळे आम्ही कंपनीकडे काही मागण्या केल्या होत्या. यातील काही मागण्या कंपनी व्यवस्थापनाने मान्य केल्या मात्र काही दिवसातच आम्हा १७ कामगारांना कामावरून निलंबित केले आहे. त्यामुळे आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. न्याय मिळावा यासाठी आम्ही सर्व कामगारांनी आपापल्या कुटुंबासमवेत पॉस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वाराशेजारी १४ मार्चपासून आमरण उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगार मंत्री, कामगार राज्यमंत्री, पालकमंत्री, स्थानिक खासदार, आमदार यांच्यासह २२ जणांना पाठवून त्यांच्याकडूनही आम्हीं न्यायाची अपेक्षा व्यक्त केली आहे, अशी माहिती या निलंबित कामगारांनी दिली.

जोपर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही उपोषणमागे घेणार नाही असा इशारा या निलंबित कामगारांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना दिला आहे.

# मुरूड नगरपालिका प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा जिल्हाधिकार्‍यांना सादर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुदत संपलेल्या मुरूड-जंजिरा नगर परिषदेच्या प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा तयार करून तो मंगळवारी (दि. ८) रायगडच्या जिल्हाधिकार्‍यांना सादर करण्यात आला असल्याची माहिती नगर परिषदेचे कार्यालयीन प्रशासकिय अधिकारी परेश कुंभार यांनी दिली.



मुरूड-जंजिरा नगर परिषदेची मुदत संपली असून याठिकाणी निवडणूक प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. त्यानुसार निवडणूक प्रक्रियेची पूर्व तयारी म्हणून प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा तयार करण्यात आला आहे. यात प्रभाग संख्या, प्रभागनिहाय अनुसूचित जाती, जमाती यांची २०११ च्या लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन व नकाशे यांचा समावेश आहे. मुरूड नगर परिषदेचा प्रभाग रचनेचा प्रारूप मसुदा मंगळवारी जिल्हाधिकार्‍यांना सादर करण्यात आला असून, त्यावर १० ते १७ मार्चपर्यंत हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्यावर २२ मार्चला सुनावणी घेऊन अंतिम प्रभाग रचना १ एप्रिल जाहीर करण्यात येणार आहे.

> **मुरुड नगर परिषद हद्दीतील लोकसंख्या १२ हजाराच्यावर असून येथे या पूर्वी १७ नगरसेवक होते ते आता २० नगरसेवक होणार आहेत. नगराध्यक्षांची निवड आता नगरसेवकांमधून होणार आहे.**
> **-परेश कुंभार, प्रशासकिय अधिकारी, मुरुड नगर परिषद**

# खोपोली येथील प्राची भावे सन्मानित

**खालापूर : प्रतिनिधी**

वरची खोपोली येथील विरेश्वर महिला मंडळाच्या वतीने ज्योतिष क्षेत्रामध्ये काम करणार्‍या प्राची नितीन भावे यांचा मंगळवारी (दि. ८) सत्कार करण्यात आला.

भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अश्विनीताई पाटील, सामाजिक कार्यकर्त्या क्षमा आठवले, सुनंदा मसुरकर, माजी उपनगराध्यक्षा विनिता कांबळे यांच्या हस्ते जागतिक महिला दिनानिमित्त प्राची भावे यांचा सत्कार करण्यात आला. प्राची भावे या ज्येष्ठ पत्रकार नितीन भावे यांच्या सौभाग्यवती असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ज्येष्ठ सदस्या आहेत. सेवाभावी वृत्तीच्या भावे यांना ज्योतिष शास्त्राचा दांडगा अनुभव आहे.

(छाया : अरूण नलावडे)



# रोह्याच्या धरमसी मोरारजी केमिकल्स कारखान्यात राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह

**धाटाव : प्रतिनिधी**

येथील औद्योगिक वसाहतीतील धरमसी मोरारजी केमिकल्स कंपनी या कारखान्यात राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. कारखान्यात काम करताना सर्वांनी सुरक्षेची साधने वापरावीत, असे आवाहन कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट संभाजी नाना जाधव यांनी या वेळी केले.

कारखान्यात सुरक्षा ध्वज फडकावून या सुरक्षा सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. उपस्थितांना सुरक्षितता संबंधित प्रतिज्ञा देण्यात आली. काही आपत्कालीन घटना घडली तर बचावासाठी काय करावे, याची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. या संपूर्ण आडवड्यात सुरक्षा, वक्तृत्व स्पर्धा आदि उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे कंपनीचे सुरक्षा अधिकारी अरुण माने सांगितले.

कंपनी व्यवस्थापक रमेश राधाराम, जियो फ्रॅन्सिस, प्रभात पात्रो तसेच सतीश वाघोसकर, राकेश खांडेकर, निलेश शेंडगे, सागर जाधव, अनिकेत पाटील, केतन पवार यांच्यासह अधिकारी आणि कामगार या वेळी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार **१) शशिकांत परमहंस चौबे २) गौरव परमहंस चौबे व ३) हरींद्र रामबडाई सिंह** यांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक **१) रोहिणी अनिल पंधे २) अंकुर अनिल पंधे ३) अमृता अनिल पंधे** यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन :**

**मौजे जिते, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ८२ | ४ | ०-१९-००<br>पो.ख. ०-०३-५०<br>एकूण ०-२२-५० | ० | २७ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांच्या आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : १०/०३/२०२२**

**पत्ता : नाथ सदन, अमराई रोड, कर्जत. ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१**

**सही/-**
**अॅडव्होकेट सचिन संजय सुर्वे**



## नोकरीविषयक

**लेडिज ऑफीस असिस्टंट पाहिजे.**
- **कॉम्प्युटर टाईपिंग आवश्यक.**
- **पनवेल क्षेत्रात**

-: संपर्कासाठी नंबर :-
९६३७१६३९१९
E-mail : ruchakul24@gmail.com


# अलिबाग पोलीस ठाण्याकडून महिलांचा सन्मान



**अलिबाग : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अलिबाग पोलीस ठाण्यातर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्‍या सात महिलांचा मंगळवारी सत्कार करण्यात आला.

अलिबागमधील भाग्यलक्ष्मी हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमात डॉ नीती भामरे, आरती साळुंखे, शकुंतला वाघमारे, दीप्ती पडवळ, श्वेता सणस, रुपाली पाटील, सारिका काटले या महिलांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. पोलीस निरीक्षक शैलेश सणस हे या कार्यक्रमास उपस्थित होते. सूत्रसंचालन अॅड. तनुश्री पेडणेकर यांनी केले. या वेळी महिला आणि अलिबाग पोलीस ठाण्याचे कर्मचारी उपस्थित होते.

## युक्रेनहून परतलेल्या पेणच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

**पेण : प्रतिनिधी**

येथील प्रांत कार्यालय तर्फे युक्रेनमधून परत आलेल्या विद्यार्थ्याचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. युक्रेनमधून परत आलेले आर्यन राजेंद्र पाटील, कोमल नंदकुमार पाटील, श्रध्दा किशोर पाटील, प्रेरणा दिघे हे एमबीबीएसचे विद्यार्थी व त्यांचे पालक यावेळी उपस्थित होते.

भविष्यात शैक्षणिक अडचणी आल्यास विद्यार्थ्यांनी शासनाकडे संपर्क साधावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार यांनी या वेळी केले.

नायब तहसीलदार प्रसाद कालेकर, मंडल अधिकारी सुरेंद्र ठाकूर यांच्यासह तलाठी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अशोक मोतीराम जयधारा यांनी मौजे- पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीमधील श्रीमती जनाबाई पांडुरंग खुटले यांचे मालकी तथा इतर सर्व हक्क हितसंबंधासहित सदर मिळकत कायमस्वरूपी खरेदीखताने मालकीहक्कात हस्तांतरीत करून घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि. रायगड**

| भूमापन क्र. | भूमापन क्र.चा उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ४० | ९ | ०-३१-६० | ४.२८ |

सदर जाहीर नोटीसीद्वारे सर्व व्यक्ती/लोकांस कळविण्यात येत आहे की, सदर मिळकतीस अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न, वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहीत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्त्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर २१ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व अनुशंगिक दस्त कायदेशीरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**दिनांक - ०९/०३/२०२२**
**ठिकाण - पनवेल**

**सही/-**
**अॅड. शरद जाधव**
**संपर्कासाठी पत्ता- तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग, भूखंड क्र. ११३, मिडल क्लास को. ऑप. हौ. सोसायटी, पनवेल-४१०२०६, ता. पनवेल, जि. रायगड**
**मो.नं. ९८२०६३७१७५**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. मच्छिंद्र गोविंद पाटील** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**
**मौजे - मालडुंगे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भूमापन नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ८२/२/अ/२ | २-००-००<br>**पैकी ०-२०-५०** | ०.३२ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदपत्र व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०९/०३/२०२२.**

**सही/-**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, जि. रायगड
दूरध्वनी क्र. २७४५६३०६



## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost. |
|---|---|---|
| Tend-36 **7000022365** | Work Supply and replacement of existing CT cable by 4CX2.5sq.mm Cu arm cables at 400kV R.S. Nagothane S/stn. | **Rs. 66.48 Lakhs** |
| Tend-38 **7000022354** | Strengthening/Rejuvenating of Existing Earthing system along with additional conventional Earth pits at 100 kV Ambernath & Dombivali sub-stations. | **Rs. 66.94 Lakhs** |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs. 500/- + GST. **Submission of bids from 09.03.2022 to 15.03.2022 up to 23:59 hrs., Opening date :- 16.03.2022.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm.) Tel. No. 9167026141

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**PRIYANKA N. PATIL**
Advocate, High Court.
C.M.A.No. 253/2022
Shraddha Sneh Apt., B-101, Opp. To Jakat Naka, Panvel- Uran Road, Koliwada, Panvel- 410206.

## PUBLIC NOTICE

**Exn. 7/n**

The general public is hereby informed that My Clients i.e. Petitioners (legal heirs) namely Smt. Gulab Khandu Patil, Mr. Amol Khandu Patil and Mr. Manoj Khandu Patil, have filed Petition for grant of the Succession Certificate bearing No. 253/2022 before Hon'ble Civil Judge (Senior Division) at Panvel, as the below mentioned property owned by Late. Shri. Khandu Gajanan Patil., i.e. the schedule of property and after his sad demise Petitioners wants to transfer the Schedule property on their names.

If anybody is having any objection, claim, interest, dispute, for the above intended sale transaction, he / she / they may contact the undersigned with the documentary proof substantiating his / her/ their objection / claims /details of the dispute / s within seven (07) days from the date of publication of this notice, falling which, My Clients / Petitioners will proceed to complete with the sale transaction with the above owners as if there are no third party claims / objections / disputes in respect of the schedule property and thereafter no claims / objections / disputes will be entertained.

**SCHEDULE OF PROPERTY**

All that the property i.e. C-5/3/2:2, New Panvel, Sector-18, District- Raigad, Panvel- 410206., belongs to Late. Shri. Khandu Gajanan Patil.

**Sd/-**
**Jr. Clerk**
**Civil Judge Senior Division Panvel**

COURT STAMP

**Sd/-**
**Asst. Superintendant**
**Civil Judge Senior Division Panvel**

**Dated this 8 days of March 2022**



## जाहीर नोटीस

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/नप -२०२२/प्र.क्र. ०२/का.६, दिनांक २२/०२/२०२२ अन्वये राज्यातील माहे एप्रिल २०२० ते मार्च २०२२ या कालावधीत मुदत समाप्त झालेल्या तसेच मुदत समाप्त होणार्‍या व नवनिर्मीत असे एकूण २०८ नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रभाग रचना कार्यक्रम-२०२२ जाहिर झालेला आहे.

संदर्भिय आदेशान्वये परिशिष्ट २ ("ब" वर्ग नगरपरिषदांसाठी) व परिशिष्ट ३ ("क" वर्ग नगरपरिषदांसाठी) मधील टप्पा क्र. १ अन्वये प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगरपरिषदांच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकुण व अनुसुचित जाती तसेच अनुसुचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सिमांकन, नकाशा परि १ ते ७ यासह) जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक ०२/०३/२०२२ (बुधवार) पर्यंत सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत. तसेच सदर प्रारुप प्रभाग रचनेस जिल्हाधिकारी यांनी दि. ०७/०३/२०२२ (सोमवार) पर्यंत मान्यता देणेबाबत आदेशीत केलेले आहे. व त्यानुसार मुख्याधिकारी, खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण यांनी प्रारुप प्रभाग रचनेचे प्रस्ताव (नगरपरिषदांच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकुण व अनुसुचित जाती तसेच अनुसुचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सिमांकन, नकाशा यासह) या कार्यालयाकडे दि. ०२/०३/२०२२ रोजी सादर केलेल्या प्रस्तावांना दि. ०७/०३/२०२२ रोजी या कार्यालयाकडून मान्यता देण्यात आलेली आहे.

संदर्भिय आदेश क्र. १ मधील परिशिष्ट २ व ३ मधील टप्पा क्र. ब(१) अन्वये दिनांक १०/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे (अधिसुचना कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सुचना मागविणेकरीता वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत आदेशित केलेले आहे. तसेच . परिशिष्ट २ व ३ मधील टप्पा क्र. ब(२) तसेच सदर प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यांवर हरकती व सुचना दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते दि. १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत मागविणेबाबत आदेशित केलेले आहे.

संदर्भिय वरील आदेश विचारत घेऊन मी, महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग, मला दिलेल्या अधिकारानुसार, रायगड जिल्ह्यातील खोपोली, अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन व उरण या नगरपरिषदांच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सादर करणेत आलेल्या प्रारुप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे रहिवाशांच्या माहितीसाठी तसेच हरकती व सुचना मागविणेसाठी खाली नमुद ठिकाणी व नमुद दिनांकास आयोजित करण्यांत आलेली आहे असे नोटीसीद्वारे जाहिर करीत आहे.

| क्र. | नगरपरिषदेचे नाव | प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यावर हरकती व सुचना स्विकारणार्‍या अधिकार्‍यांचे नाव व पदनाम | प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यावर हरकती व सुचना मागविण्याचा कालावधी | प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे यावर हरकती व सुचना स्विकारण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | खोपोली | मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | खोपोली नगरपरिषद कार्यालय, ता. खालापूर, जि. रायगड |
| २ | अलिबाग | मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | अलिबाग नगरपरिषद कार्यालय, ता. अलिबाग, जि. रायगड |
| ३ | महाड | मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | महाड नगरपरिषद कार्यालय, ता. महाड, जि. रायगड |
| ४ | माथेरान | मुख्याधिकारी, माथेरान नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | माथेरान नगरपरिषद कार्यालय, ता. कर्जत जि. रायगड |
| ५ | मुरूड जंजिरा | मुख्याधिकारी, मुरूड जंजिरा नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालय, ता. मुरूड, जि. रायगड |
| ६ | पेण | मुख्याधिकारी, पेण नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | पेण नगरपरिषद कार्यालय, ता. पेण, जि. रायगड |
| ७ | रोहा | मुख्याधिकारी, रोहा नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | रोहा नगरपरिषद कार्यालय, ता. रोहा, जि. रायगड |
| ८ | श्रीवर्धन | मुख्याधिकारी, श्रीवर्धन नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय, ता. श्रीवर्धन, जि. रायगड |
| ९ | उरण | मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद | दि. १०/०३/२०२२ (गुरूवार) ते १७/०३/२०२२ (गुरूवार) पर्यंत सकाळी १०.०० ते सायं ६.०० पर्यंत | उरण नगरपरिषद कार्यालय, ता. उरण, जि. रायगड |

उरण नगरपरिषदेचे प्रारूप प्रभाग रचना, प्रभाग दर्शक नकाशे व परिशिष्ट २ नागरिकांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागवणेकरिता http://uranmahaulb.maharashtra.gov.in/ या वेबसाईटवर तसेच नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ठिकाण :- रायगड-अलिबाग
दिनांक :- १०/०३/२०२२

शिक्का

सही/-
(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी रायगड, अलिबाग

## वरिष्ठ गट क्रिकेट स्पर्धा

# रायगडचा नाट्यमय विजय

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने पुणे येथे सुरू झालेल्या वरिष्ठ गट आमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धेतील साखळी सामन्यात रायगडच्या संघाने एमसीव्हीएस या संघावर १४ धावांनी नाट्यमय विजय मिलवला. रायगडने पहिल्या सामन्याचे पूर्ण गुण वसूल केले.



नाणेफेक जिंकून रायगड संघाने फलंदाजी स्वीकारली. रायगडाचा पहिला डाव ५२ धावांतच आटोपला. एमसीव्हीएस संघाने पहिल्या डावात १३६ धावा करून ८४ धावांची आघाडी घेतली होती. रायगडाने दुसऱ्या डावात १९१ धावा केल्या. सामना जिंकण्यासाठी एमसीव्हीएस संघाला दुसऱ्या डावात १०८ धावा करायच्या होत्या, मात्र त्यांचा दुसरा डाव ९३ धावांत गुंडाळून रायगडाने हा सामना १४ धावांनी जिंकला.

संपूर्ण सामन्यात रायगडचा संघनायक सागर सावंत (सात बळी व ३५ धावा), अभिषेक खातू (आठ बळी व ३६ धावा) आणि सिद्धांत म्हात्रे (तीन बळी व १७ धावा) या तिघांच्या अष्टपैलू खेळामुळे रायगडने एमसीव्हीएस संघाविरुद्ध विजय साकारला.

अटीतटीच्या सामन्यात विजय मिळवल्याबद्दल रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते व सर्व सभासद तसेच रायगडच्या सर्व क्रिकेटप्रेमींनी आपल्या संघाचे मनापासून अभिनंदन केले आणि पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

*सागर सावंतने आपल्या दुसऱ्या व संघाच्या तिसऱ्या षटकामध्ये ० धावेवर पहिला बळी मिळवून सुरुवात छान करून दिली. दुसऱ्या बाजूने डावखुरा फिरकी गोलंदाज सिद्धांत म्हात्रेने पहिली सातही षटके निर्धाव टाकून एक बळीही घेतला. त्यामुळे एमसीव्हीएमच्या फलंदाजांवर दडपण आले.*




# वीर तायक्कांदो अकॅडमीचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड तायक्कांदो असोसिएशनतर्फे खांदा कॉलनीतील न्यू होरायझन पब्लिक स्कूल येथे २०वी ज्युनियर रायगड डिस्ट्रिक्ट चॅम्पियनशिप झाली. या स्पर्धेत वीर तायक्कांदो अकॅडमीने घवघवीत यश प्राप्त केले

स्पर्धेत वीर तायक्कांदो अकॅडमीच आयन शेख, विदेश वास्कर, पार्थ जाधव, अर्जुन करातगी, आदित्य रामरामे, निहाल भोईर यांनी सुवर्णपदक, तर हुसेन शेख व मेहेक खान यांनी रौप्यपदक पटकाविले.

प्रशिक्षक संजय भोईर, हेमंत कोळी, प्रज्ञा भगत व संदीप भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वीर तायकांडो अकॅडमीच्या खेळाडूंनी हे यश मिळवले. अकॅडमीचे अध्यक्ष हरेश्वर भगत यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी आणि राज्यस्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# कबड्डी स्पर्धेत मजगाव संघ विजेता

**मुरुड : प्रतिनिधी**

येथील श्री काळभैरव क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कबड्डी स्पर्धेत भैरवनाथ मजगाव संघाने विजेतेपद पटकाविले. त्यांनी अंतिम सामन्यात वादळ खारीकवाडा संघावर आठ गुणांनी मात केली.

मुरुड तालुक्यातील २० संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. सामने रंगतदार झाले.

तृतीय क्रमांक बापुजीदेव जोसरांजण आणि चतुर्थ क्रमांक श्री गणेश आदाड संघाने मिळविला. विजेत्या संघांना रोख रक्कम व चषक देण्यात आले.



(छाया : संजय करडे)

सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून रोजित माळी (मजगाव) सर्वोत्कृष्ट पकडपटू म्हणून नागेश माळी (खारीकवाडा), सर्वोत्कष्ट चढाईपटू केतन पाटील (जोसरांजण), तर शिस्तबद्ध संघ म्हणून राधाकृष्ण संघ नवीवाडी यांना गौरविण्यात आले.

## सिंधू, श्रीकांतची विजयी सलामी

**म्युलहाइम : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील रौप्यपदक विजेता किदाम्बी श्रीकांत या आघाडीच्या भारतीय खेळाडूंनी जर्मन खुल्या बॅडिमटन स्पर्धेत (सुपर ३०० दर्जा) विजयी सलामी दिली.

सातव्या मानांकित सिंधूने महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत थायलंडच्या बुसानन ओंगबमरुंगपानला २१–८, २१–७ असे सरळ गेममध्ये पराभूत केले. पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत आठव्या मानांकित श्रीकांतने फ्रान्सच्या ब्राइस लेव्हेर्डेझवर २१–१०, १३–२१, २१–७ अशी मात केली.



**उलवे नोड : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि निहोन्सिकी कराटे व स्पोर्ट्स फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलव्यातील महिलांसाठी एकदिवसीय महिला स्वसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये व्यवस्थापक प्रणित गोंधळी, शिहान राकेश तिवरेकर, सेन्साई सागर दिवाळे, हरेश्वर तांबटकर, संपई आकाश जैन, वरिष्ठ विद्यार्थी निर्माई, जीविका, सिद्धी, वैष्णवी यांच्या सहकार्याने झालेल्या या कार्यशाळेला महिलांचा प्रतिसाद लाभला.**

*वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी*
राम प्रहर

# पॉवर लिफ्टिंगमध्ये खोपोलीतील विनायक पाटीलला सुवर्णपदक



**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने मुंबई प्रभादेवी येथे सब जूनियर, सीनियर, मास्टर मुले–मुली यांची विविध गटांत स्पर्धा घेण्यात आली होती. यातील ६६ वजनी गटात खोपोलीतील महिंद्रा सानयो कंपनीतील कामगार विनायक पाटील याने सुवर्णपदक पटकाविले. याबद्दल नुकतेच त्याचा कंपनीचे वरिष्ठ संचालक अविनाश सोमवंशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय कामगार संघ युनियनचे स्थानिक अध्यक्ष रवींद्र कांबळे तसेच नितीन मोरे, प्रभाकर पाटील, संदेश पाटील ,रणजीत सिंग आदी सदस्य उपस्थित होते.

दरम्यान, केरळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी विनायक पाटील याची निवड करण्यात आली आहे. त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.







**मुंबई : अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या हस्तकांशी केलेल्या आर्थिक व्यवहारप्रकरणी ईडी कोठडीत असलेले राज्याचे अल्पसंख्याक विकासमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या राजीनाम्यासाठी बुधवारी भाजपच्या वतीने आझाद मैदानात विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात पनवेल, उरणसह रायगडातून नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**









**महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री नवाब मलिक यांना ईडीकडून अटक झाल्यानंतर भाजपने त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनातही याचे पडसाद उमटले असून बुधवारी भाजप आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर निदर्शने केली.**




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com